# ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २९२ /२०२५ दि. १६ /०९/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी**, **ठाणेनगर** वाहतूक उपविभागाच्या हद्दीत दि. २२/०९/२०२५ ते दि. ०२/१०/२०२५ या कालावधीत भवानी चौक, **टेंभीनाका ठाणे** येथे **'नवरात्रौत्सव'** दरम्यान दुर्गादेवीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) ठाणे स्टेशन येथुन सिव्हिल हॉस्पीटलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहानांना (टी.एम.टी. व एस.टी. बसेस सह) **टॉवर नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ही टॉवरनाका येथुन डावीकडे वळून गडकरी सर्कल, दगडीशाळा, अल्मेडा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) गडकरी सर्कल कडून टॉवर नाक्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना (टी.एम.टी.व एस.टी.बसेस) **परफेक्ट ड्रायव्हिंग स्कुल (गडकरी सर्कल)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने व टी.एम.टी बसेस हया गडकरी सर्कल, दगडीशाळा चौक, अल्मेडा चौक मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) चरईकडुन एदलजी रोडने भवानी चौक टेंभी नाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धोबीआळी क्रॉस ( मे.फेअर अपार्टमेंन्ट )** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व प्रकारची वाहने ही धोबी आळी क्रॉस (मे.फेअर अपार्टमेंन्ट) पर्यंत सरळ जावून डावीकडे वळून धोबी आळी चौक – डॉ.सोनुमिया रोड – धोबीआळी मशिद – सिव्हिल हॉस्पीटल मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) कोर्टनाका सर्कलकडुन आनंद आश्रम मार्गे टॉवरनाकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथुन डावीकडे वळुन जांभळीनाका मार्गे टॉवरनाका येथुन पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) दगडीशाळा चौक बाजुकडुन विर सावरकर रोड मार्गे टेंभीनाक्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **दांडेकर ज्वेलर्स (यशोदिप क्लासेस)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने दांडेकर ज्वेलर्स (यशोदिप क्लास) येथुन डावीकडे वळून उत्तम मोरेश्वर मार्गे धोबीआळी क्रॉस (मे फेअर अपार्टमेंट) सरळ जावून धोबीआळी चौक – सोनमिया रोडने धोबीआळी मशिद पुढे सिव्हील हॉस्पीटल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडने व मिनाताई ठाकरे चौकाकडुन सिव्हील हॉस्पीटल कॉर्नरमार्गे टेंभीनाक्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **सिव्हील हॉस्पीटल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर येथुन जी.पी.ओ. मार्गे कोर्टनाका सर्कल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथुन डावीकडे वळून जांभळीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**नो पार्किंग –** दगडी शाळा, सेंट जॉन बॉप्टीस्ट हायस्कुल (जुना मुंबई आग्रा रोड), दांडेकर ज्वेलर्स, उत्तम मोरेश्वर आंग्रे, अहिल्यादेवी गार्डन, धोबीआळी परिसरात, डॉ. सोनु मिया रोड ते सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर या परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक अधिसूचना दि. २२/०९/२०२५ ते दि.०२/१०/२०२५ या कालावधीत सायंकाळी १६.०० ते रात्रौ २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :—**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—१, ठाणे, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :—**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई—विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व प्रभारी अधिकारी, ठाणेनगर, नौपाडा, कोपरी वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.